**अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यातील खाजगी संस्थांना नवीन हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी महाविद्यालय सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
शासन शुद्धिपत्र क्र. टिईएम-२०१०/(१६५/१०)/तांशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ४ जानेवारी, २०१३.

संदर्भ : १) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली त्यांचे पत्र क्र. Western १-११७४१०४१/२०१०/New दिनांक १३.०७.२०१०
२) शासन निर्णय क्र. टिईएम-२०१०/(१६५/१०)/तांशि-४, दिनांक २६.०७.२०१०
३) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचे पत्र क्र. Western १-४४५३७५०४१/२०११/ EOA दिनांक ३०.०८.२०११
४) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचे पत्र क्र. Western १-७००७९८९३१/२०१२/ EOA दिनांक १०.०५.२०१२

**प्रस्तावना :** अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या संदर्भ क्र. १ नुसार टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे टिएमव्ही इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी, जयवंतराव टिळक भवन, फेज १, विद्यापीठ कॅम्पस, गुलटेकडी, मुकूंद नगर, पुणे ४११ ०३७ या संस्थेला शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून संदर्भ क्र. २ शासन निर्णय अन्वये मान्यता देण्यात आलेली होती.

सदर शासन निर्णयात परिच्छेद क्र. २ येथे शैक्षणिक वर्ष २०१०-११ करिता असा उल्लेख करण्यात आला होता. परंतु आता अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने त्यांच्या संदर्भ क्र. ३ च्या पत्रानुसार संस्थेस २०१२-१३ करिता मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यानुसार शासन निर्णयामध्ये सुधारणा करणे शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन शुद्धिपत्र :-** टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे टिएमव्ही इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी, जयवंतराव टिळक भवन, फेज १, विद्यापीठ कॅम्पस, गुलटेकडी, मुकूंद नगर, पुणे ४११ ०३७ पुणे यांच्या संदर्भ क्र. २ शासन निर्णयात परिच्छेद क्रमांक २ येथे "**शैक्षणिक वर्ष २०१०-११ करिता**" ऐवजी "**शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून**" असे वाचण्यात यावे. मात्र सदरहू संस्थेने शैक्षणिक वर्ष २०१३-१४ आणि त्यापुढील कालावधीसाठीची मान्यता (Extension of

Approval) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेकडून वेळोवेळी प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील. या अटींच्या अधीन राहून सदरहू शुद्धिपत्र निर्गमित करण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

(म.मा. मोरवे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे
कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
संबंधित संस्था
अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली- ११० ००१.
सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरंस बिल्डींग, २ रा मजला, चर्चगेट, मुंबई.
निवड नस्ती/तांशि-४